

## विजयाचा जल्लोष...

कर्नाटकातील सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाने मोठा विजय मिळविल्यानंतर बंगलोर येथे कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मुखवटा चढवून उत्सव साजरा केला.

# मुंबई, गुजरात, उत्तर प्रदेशात दहशतवादी हल्ल्याचा धोका

**मुंबई । दि.१५ वृत्तसंस्था**

२०१९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत घातपात घडवून आणण्यासाठी पाकिस्तानात दहशतवाद्यांनी प्रशिक्षण शिबिरे सुरू केली आहेत. मुंबई, गुजरात आणि उत्तर प्रदेशात हल्ला करण्याची तयारी या दहशतवाद्यांनी सुरू केल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. त्यामुळे या तिन्ही राज्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पाकिस्तानात दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण घेतलेल्या मिर्झा फैजल खानला दहशतवादविरोधी पथकाने गेल्या आठवड्यात अटक केली होती. मिर्झाची चौकशी केली असता त्याने या हल्ल्याची माहिती दिली. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटानंतर फरार झालेल्या फारूख देवाडीवालासाठी मिर्झा काम करीत होता. या बॉम्बस्फोटात मिर्झाचे नाव आले नव्हते. मात्र या बॉम्बस्फोटाच्या कटाशी संबंधित आरोपी सलीम कुर्लासाठीही तो काम करीत होता. फारूखने मिर्झाला शारजाहला बोलावून घेतले होते. तेथून मिर्झाला दुबईला पाठवण्यात आले. दुबईतून नैरोबीला जाण्यासाठी त्याचे तिकीट बुक करण्यात आले. मात्र नैरोबीला जाण्याऐवजी तो कराचीला उतरला. आयएसआयने त्याला कराचीत १५ दिवस शस्त्र चालवण्यापासून ते बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण दिले होते. त्यानंतर त्याला मुंबईत पाठवले गेले. मुंबईत आल्यावर मिर्झाने अनेक ठिकाणांची रेकी केली. त्याला महाराष्ट्रातील बड्या नेत्यांची हत्या करण्यास सांगण्यात आले होते, अशी माहिती त्याने दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, मिर्झासहित भारतात पाठवल्या गेलेल्या दहशतवाद्यांना शस्त्रसाठा न मिळाल्याने त्यांना भारतात हल्ले करता आले नाहीत. या दहशतवाद्यांना नेपाळमार्गे हत्यारे पाठवण्यात आली आहेत. मात्र हा शस्त्रसाठा हाती लागण्यापूर्वीच मिर्झाला दहशतवादविरोधी पथकाने ताब्यात घेतले. त्याच्या अटकेनंतर त्याचे साथीदार भूमिगत झाले आहेत. हे सर्वजण 'युनायटेड जिहाद काउन्सिल' या दहशतवादी संघटनेसाठी काम करीत आहेत. ही दहशतवादी संघटना इतर दहशतवादी संघटनांना भारतात दहशतवादी कारवाया करण्याचे काम देते, असे मिर्झाने तपासात सांगितल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.

## गुन्ह्यातून सिद्धू मुक्त

**नवी दिल्ली । दि.१५ वृत्तसंस्था**

रोडरेज केसप्रकरणी ३० वर्षानंतर माजी क्रिकेटपटू आणि पंजाबचे कॅबिनेट मंत्री नवज्योतसिंग सिद्धू यांना दिलासा मिळाला आहे. सिद्धूची सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. मारहाणीच्या प्रकरणात सिद्धू दोषी आढळले असले तरी दंड आकारून त्यांना सोडून देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

रोडरेज प्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने सिद्धूंची निर्दोष मुक्तता केली होती. मात्र पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निकाल बदलून सिद्धूंना दोषी ठरवले होते. या खटल्यात उच्च न्यायालयाने त्यांना तीन वर्षांची शिक्षाही सुनावली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात सिद्धू यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने त्यांना मोठा दिलासा दिला आहे. २७ डिसेंबर १९८८ मध्ये पटियाला येथील गुरनाम सिंह यांना सिद्धूने बुक्का मारला होता. त्यात त्यांचा मृत्यू झाला होता.

सिद्धू यांची सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यातून आज मुक्तता करण्यात आली. मात्र मारहाणीप्रकरणी ते दोषी आढळल्याने एक हजार रुपये दंड ठोठावून त्यांची सुटका करण्यात आली. या निकालामुळे त्यांच्या मंत्रीपदाला कोणताही धोका नसल्याचे सांगण्यात आले. सिद्धू सध्या पंजाब सरकारमध्ये पर्यटनमंत्री आहेत. या खटल्यात आपल्याला फसवले जात असल्याचे सिद्धूंनी सुरुवातीपासूनच म्हटले होते. तर उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवावा, असे प्रतिज्ञापत्र पंजाब सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केल्याने सिद्धू यांची डोकेदुखी वाढली होती.

# लावणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकर यांचे निधन

**पुणे । दि.१५ वृत्तसंस्था**

'जिवलगा, तुम्ही माझे सावकार, शेत जमीन गहाण ठेवीते, घेते मी रोखा करूनी, तुम्ही माझे सावकार...' अशा शब्दांत फड रंगवून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या आणि पारंपरिक पद्धतीने बैठकीची घरंदाज लावणी गाणाऱ्या गायिका, लावणीसम्राज्ञी पद्मश्री यमुनाबाई विक्रम जावळे उर्फ यमुनाबाई वाईकर यांचे आज सकाळी ११ वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. त्या १०३ वर्षांच्या होत्या. उद्या साताऱ्यात वाई येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

यमुनाबाई वाई येथील कोल्हाटी समाजाच्या वस्तीत राहत होत्या. ही वस्ती म्हणजे लोककलेचे माहेरच होते. यमुना, तारा, हिरा या तीन बहिणी. आईचे नाव गीताबाई! त्याही गात. वयाच्या दहाव्या वर्षापासून डोंबारी खेळातून पोट भरता-भरताच यमुनाबाईंनी गाणे गायला सुरुवात केली. त्यांना आईकडूनच गाण्याचा वारसा मिळाला. त्यानंतर त्या 'रंगू आणि गंगू' फडावर दाखल झाल्या. तेथे त्या ठेका आणि नृत्यकला शिकल्या. वाईला परत आल्यावर 'यमुना-हिरा-तारा संगीत पार्टी'ची स्थापना त्यांनी केली. त्यांच्या कलेची दखल घेत भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' पुरस्कार देऊन गौरवले. त्यांना टागोर अॅकॅडमीचा जीवन गौरव, माणिक वर्मा प्रतिष्ठान, संगीत अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र राज्य सरकारचा लावणी सम्राज्ञी पुरस्कार, जागतिक मराठी परिषद, पहिला लोकरंगभूमी पुरस्कार, वसुंधरा पंडित पुरस्कार, अहिल्याबाई होळकर पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

### एका रसिकासाठी रात्रभर गायन

यमुनाबाई वाईकर या अस्सल जातीवंत कलावंत होत्या. लावणी गाताना त्या तल्लीन होऊन गात. समोर किती रसिक बसले आहेत याचा विचारही करीत नसत. एकदा औरंगाबादला संगीतबारी चालू होती. आसपास सगळे फड लागले होते. सगळीकडे खूपच गर्दी होती, पण त्यांच्या फडावर एकच तिकिट विकले गेले. त्यांनी त्या रसिकाचे पैसे परत करण्यास मॅनेजरला सांगितले, पण तो रसिक काही ऐकेना. मी इतका लांबून आलो आहे. यांची लावणी ऐकल्याशिवाय मी जाणार नाही, असे तो म्हणाला. त्याचा आग्रह पाहून यमुनाबाईंनी कार्यक्रम सादर केला. यमुनाबाई त्या एका रसिकासाठी गायला बसल्या खऱ्या, पण एक-दोन गाणी झाल्याबरोबर चारी बाजूनं गर्दी उसळली. कार्यक्रम हाऊसफुल झाला. मैफिलही रात्रभर रंगली.

## 'इव्हीएम'बाबत शंका : राष्ट्रवादी

**मुंबई । दि.१५ वृत्तसंस्था**

कर्नाटकात काँग्रेसची स्थिती चांगली होती. तेथील लोक काँग्रेसबाबत नकारात्मक नव्हते. त्यामुळे काँग्रेसचा विजय निश्चित होता. मात्र भाजपला एवढे मोठे यश मिळते यावर विश्वास बसत नाही. लोकांच्या मनात जे होते आणि खऱ्या परिस्थितीत सुसंगती नसल्याचे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगून इव्हीएमबाबत शंका उपस्थित केली आहे. कर्नाटक निवडणूक निकालावर पाटील यांनी ट्विटरवरुन प्रतिक्रिया नोंदवली.

मतांचे विभाजन झाल्याने भाजपला फायदा झाल्याचे म्हटले जात आहे. मात्र जेथे भाजपची अवस्था बिकट होती तेथेही त्यांचा उमेदवार निवडून येत असल्यास इव्हीएमबाबत शंका येणे साहजिक असल्याचेही पाटील यांनी म्हटले आहे. काँग्रेसने मतविभाजन टाळले तर भाजपला रोखणे शक्य आहे. तसेच कर्नाटकात जेडीएसला पाठिंबा देण्याचा चांगला निर्णय असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी ट्विटरवर म्हटले आहे.

## मुलगा जिंकला, सिद्धरामय्या हरले

**बंगळुरू । दि.१५ वृत्तसंस्था**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या चामुंडेश्वरी विधानसभा मतदारसंघातून पराभूत झाले आहेत, पण त्यांचा मुलगा यथिंद्रा सिद्धरामय्या याने वरुणा विधानसभा मतदारसंघातून दणदणीत विजय मिळवला. म्हैसूर जिल्ह्यातील वरुणा हा सिद्धारामय्या यांचा बालेकिल्ला, पण हा मतदारसंघ त्यांनी मुलासाठी सोडण्याचा निर्णय घेतला.

यथिंद्राने वरुणामधून भाजपच्या थोतादाप्पा बसावाराजू यांच्यावर ४५ हजार मतांनी विजय मिळवला. सिद्धारामय्या यांनी वरुणाऐवजी शेजारच्या चामुंडेश्वर मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. विजयाची खात्री नसल्याने ते चामुंडेश्वर बरोबर बदामीतूनही निवडणूक लढवत होते. त्यांच्या या निर्णयावर जोरदार टीकाही झाली. सिद्धरामय्या यांनी यापूर्वी चामुंडेश्वरीतून निवडणूक लढवली आहे, पण २००८ सालपासून ते वरुणा मतदारसंघातून निवडणूक लढवत होते. चामुंडेश्वरीत सिद्धारामय्या पराभूत झाले तरी बागलकोट जिल्ह्यातील बदामी मतदारसंघातून ते विजयी झाले आहेत. बदामीत त्यांनी भाजपच्या श्रीरामलु यांचा ४ हजार मतांच्या फरकाने पराभव केला.

## भंडारा जिंकू ठोकून, पालघर जिंकू ठासून-शेलार

**मुंबई** । कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या घवघवीत यशानंतर पक्षाचे नेते आक्रमक झाले आहेत. भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी कर्नाटकमधील निकालाचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर आक्रमक ट्विट केले आहे. 'कर्नाटकात जिंकलो. मतदारांचे आभार! आता भंडारा जिंकू ठोकून, पालघर जिंकू ठासून', अशा शब्दांत अप्रत्यक्षपणे शिवसेनेला डिवचले आहे.

# 'राहुल गांधींनी खूप मेहनत घेतली, आणखी एक राज्य गमावले'

**नवी दिल्ली । दि.१५ वृत्तसंस्था**

कर्नाटक विधानसभा निवडणुकांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. भाजप येथे सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. काँग्रेसच्या हातातून आणखी एक राज्य जवळपास गेल्यात जमा आहे. त्यावर भाजप समर्थक नेटकऱ्यांनी समाज माध्यमांवरून राहुल यांच्यावर निशाणा साधला आहे. 'राहुल गांधी यांनी खूप मेहनत घेतली आणि त्यांच्या मेहनतीमुळेच काँग्रेसने आणखी एक राज्य गमावले, त्याबद्दल राहुल यांचे आभार!' अशा प्रकारचे खिल्ली उडवणारे एकाहून एक मजेशीर ट्विट युजर्स करीत आहेत.

कर्नाटक निवडणूक ही राहुल गांधींसाठी मोठी परीक्षा मानली जात होती. औपचारिकरित्या काँग्रेस अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर लढवलेली ही पहिलीच मोठी निवडणूक होती. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या गुजरातसह अन्य दोन राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेस अध्यक्षपदी सोनिया गांधी होत्या तर निकालापूर्वी ही सूत्रे राहुल यांच्याकडे सोपवण्यात आली होती. पंजाबचा अपवाद वगळता गेल्या चार वर्षांत काँग्रेसला एकामागून एक राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. तर कर्नाटक हे काँग्रेसकडे असलेले शेवटचे मोठे राज्य होते. काँग्रेसकडे आता फक्त पंजाब, मिझोरम आणि पाँडिचेरी हीच राज्ये आहेत. आता हाच मुद्दा हेरून समाजमाध्यमांवर भाजप समर्थकांकडून राहुल यांना मोठ्या प्रमाणात ट्रोल केले जात आहे.

### भाजपला नेटकऱ्यांकडून आश्वासनांचे स्मरण

कर्नाटकात भाजपची विजयाच्या दिशेने आगेकूच सुरु दिसत होती. त्यामुळे समाजमाध्यमांवरून भाजपला त्यांच्या जाहीरनाम्याची आठवण करुन दिली गेली. कर्नाटकात सत्ता मिळवण्यासाठी भाजपाने शेतकऱ्यांना कर्जमाफी, मोफत स्मार्टफोन, लॅपटॉप आणि सोनं देण्याचे आश्वासन दिले आहे. कर्नाटकाच्या या निकालावर समाज माध्यमांवर विविध प्रतिक्रिया उमटत असताना नेटकऱ्यांनी भाजपला जाहीरनाम्यातील आश्वासनांची आठवण करुन दिली आहे.

---

**दि जनलक्ष्मी को-ऑप. बँक लि., नाशिक (शेड्यूल्ड बँक)**
केंद्र कार्यालय: समृद्धी, गडकरी चौक, जुना आग्रारोड, नाशिक-२
फोन: (०२५३) २५७७८७२,७३, फॅक्स: (०२५३) २३११८७५

**बँकेच्या नाशिकरोड शाखेसाठी मुख्य रस्त्यालगत तळमजल्यावर असलेली ५०० ते ६०० चौ.फुट जागा भाडे तत्वावर घ्यावयाची आहे. त्यासाठी जागा मालकांनी बँकेच्या केंद्र कार्यालयात जाहिरात प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आंत कार्यालयीन वेळेत प्रस्ताव / निविदा पाठवावेत.**

**कार्यकारी संचालक**

---

**पंजाब आणि सिंध बँक**
(भारत सरकारचा उपक्रम)
हार्दिक कॉम्प्लेक्स, सम्राट बिल्डींग,
आंबेडकरनगर समोर, नाशिक-४२२००६

**ई-लिलाव मोहीम**

सरफेसी अधिनियम २००२ अंतर्गत वाहनाचे नाव : ह्युंडाई आय २० अॅस्टा कार यासाठी एमआरपी निश्चित : रु. ४.६० लाख, तपासणीची तारीख, वेळ – ६/६/२०१८, बयाणा रक्कम, दिनांक व वेळ – १६/६/२०१८, ई-लिलाव दिनांक, वेळ : १८/६/२०१८ अधिक माहितीसाठी संपर्क बँक फोन नं. ०२५३-२४१०५४० किंवा सी १ इंडिया मो.नं.९८२१६९०९६८

---

## NOTICE - 23B

| | | |
|---|---|---|
| 1) Land Owner | : | Icchamani Developers |
| 2) Architect Name | : | Architect Datta Bodhe |
| 3) Structural Engineer | : | Engg. P. M. Bhore |
| 4) Survey No. & Plot No. | : | Sr. No. 32/1,<br>Plot No. 17+18+19,<br>Shiwar Wadala |
| 5) Appr. No. & Date | : | LND/BP/A4/136/2012/14,<br>Dt. 9/09/2014 |
| 6) No. of Units | : | 26 |
| 7) Area of Plot | : | 893.63 Sq.Mtrs. |
| 8) Builtup Area | : | 1249.76 Sq.Mtrs. |

---

## NOTICE UNDER SECTION 23/24 B

| | |
|---|---|
| Name of Project | : Balaji Darshan Apartment |
| Name & Address of Owner | : Nitin Murlidhar Shinkar / Pradeep Jagannath Shirude, 9, Dattakunj Apartment, Behind Akashwani Tower, Off Gangapur Road, Nashik-13. |
| Name & Address of Architect | : Kshitij B. Dhande, Indira Nagar, Nashik. |
| Name & Address of Engineer | : Ujval Chaudhari, B.J. Market, Jalgaon. |
| Plot No. | : 2 |
| Survey No. | : 242/1/2/1/2/2 |
| Shiwar | : Nashik |
| B. P. No. | : Panch/C-1/1233/6818<br>Dated 26/03/2013 |
| No. of Residential Units | : 8 |

Approved plans available in owner's office for inspection.

---

## NOTICE 23 B

NAME OF OWNER : MANOJKUMAR U. SURANA & ONE
ADD. : PLOT NO. 3, S.NO 34/1B/2, DEOLALI SHIWAR
NAME OF ARCHITECT : AR. CHETAN DAGA
PH.- 0253 2232670
NAME OF CEMENT NO. : LND/BP/C3/280/17
DT. 2/5/2015
F.S.I. PERMITTED : 1
NO. OF RESIDENTIAL FLATS : 4
NO. OF TENAMENTS : 4
NO. OF SHOPS : 2
TOTAL BUILTS UP AREA PROPOSED : 639.86 DQ.MTR
AREA OF PLOTS : 459.90 SQ MTR
Approved Copy of Municipal Drawing Are Available At Site

---

## NOTICE AS PER 23 B CONDITION

OWNER : Shree Sainath Land & Development (India) Pvt. Ltd. Company Through Director Shri Naresh Jagumal Karda & Viva Highways Ltd. Company
P.No. & S.No. : S.No. 114A/1-1(p)+114(p)+114C(p)
Architect : SANKHLA ASSOCIATES
Ph- 2595034, 2590137
Engineer : Shailesh P. Dhumne
B.P.No. : LND/BP/NO.C3/16121/234 Date - 17/2/2018
F.S.I. : 36831.20 Sqm. (Built Up Area)

---

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांस विशेषत: उत्कर्ष बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार श्री. मयूर साहेबराव ताजणे व श्री. हेमंत यशवंत गायकवाड तसेच श्री. प्रवीण दत्तात्रय ऊर्फ दत्ताराम देठे यांना या जाहीर इशारा नोटीसीअन्वये कळविण्यात येते की, मौजे नाशिक येथील सर्व्हे नं. ९८९/१अ/१२ यातील प्लॉट नं. १२ यांसी क्षेत्र ७७७.५० चौ.मी. या मिळकतीबाबत.

उपरोक्त मिळकत ही आमचे पक्षकार श्री. राजेंद्र मुरलीधर शिंदे व इतर यांचे वडिलोपार्जित स्वरुपाची मिळकत आहे. आमचे पक्षकारांचे पूर्वज कै. हौशाबाई मुरलीधर शिंदे यांचे नाव संपूर्ण सर्व्हे नंबरमध्ये मालक व कब्जेदार सदरी दाखल होते. तदनंतर त्यांचे नावाचे तथाकथित जनरल मुखत्यारपत्राचा वापर करून उपरोक्त मिळकत श्री. अशोक शबाजी पाटील यांनी दत्तात्रय जगन्नाथ देठे यांना विक्री केली. मात्र त्यांचे नाव मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला दाखल होणेकामी अर्ज दाखल केल्यानंतर कै. हौशाबाई मुरलीधर शिंदे यांनी त्यावर हरकत उपस्थित केली. सदर हरकतीवर तक्रार रजिस्टरचे कामकाज चालवून मे. कोर्टाने हौशाबाई मुरलीधर शिंदे यांचे नाव कायम ठेवणेबाबत आदेश दिलेला आहे. त्यामुळे हौशाबाई मुरलीधर शिंदे यांचे नाव उपरोक्त नमूद केलेल्या प्लॉट मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला कायम करण्यात आले होते. तदनंतर हौशाबाई मुरलीधर शिंदे या मयत झालेल्या असून, त्यांना वारसदार आमचे पक्षकार म्हणजेच श्री. राजेंद्र मुरलीधर शिंदे व इतर असल्याने त्यांची नावे मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला मालक व कब्जेदार सदरी दाखल झालेले आहेत. तसेच सदर नावे आजही कायम आहेत. त्यामुळे उपरोक्त मिळकतीत आमचे पक्षकार यांचे कायदेशीर हिस्सा, हक्क व हितसंबंध आहेत.

आमचे पक्षकारांचे नावाव्यतिरिक्त मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला श्री. प्रवीण दत्तात्रय देठे व इतर यांची नावे दाखल आहेत. त्याचा गैरफायदा घेऊन श्री. प्रवीण दत्तात्रय देठे व इतर यांनी कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत श्री. संदीप चांगदेव बेंडाळे व श्री. सूर्यकांत सुधाकर सोनवणे यांच्याशी व्यवहार केल्याचे दिसून येते तसेच श्री. संदीप बेंडाळे व सूर्यकांत सोनवणे यांनी श्री. प्रवीण दत्तात्रय देठे यांचे संमतीने उत्कर्ष बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांचेबरोबर मिळकत विक्रीबाबत व्यवहार केलेला आहे. तसेच त्यांचेकडून रक्कम स्वीकारलेली आहे. तदनंतर उत्कर्ष बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. मयूर साहेबराव ताजणे व श्री. हेमंत यशवंत गायकवाड यांनी ॲड. श्री. चंद्रकांत एम. पवार यांचे मार्फत आमचे पक्षकार यांना नोटीस पाठविली व त्यात आमचे पक्षकारांचा मिळकतीशी काहीही संबंध नाही, असा मजकूर दाखल केला. सदर नोटीसीमुळे आमचे पक्षकारांना कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत श्री. प्रवीण दत्तात्रय देठे व इतर यांनी व्यवहार केल्याचे समजले.

श्री. प्रवीण दत्तात्रय देठे व इतर यांना उपरोक्त नमूद केलेल्या मिळकत परस्पर विक्री करण्याचा कुठलाही हक्क व अधिकार नाही. तसेच मिळकतीत आमचे पक्षकारांचा कायदेशिर हक्क हिस्सा व अधिकार असल्याने आमचे पक्षकारांचे संमतीशिवाय तसेच आमचे पक्षकारांना कुठलाही मोबदला न देता सदर मिळकत विक्री करण्याचा श्री. प्रवीण दत्तात्रय देठे व इतर यांना कुठलाही अधिकार नाही, असे असताना श्री. प्रवीण दत्तात्रय देठे यांनी उपरोक्त नमूद केलेल्या मिळकतीबाबत श्री. संदीप चांगदेव बेंडाळे व इतर तसेच उत्कर्ष बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार श्री. मयूर साहेबराव ताजणे व श्री. हेमंत यशवंत गायकवाड यांचेशी केलेले व्यवहार मिळकतीवर तसेच आमचे पक्षकारांवर बंधनकारक नाही. त्याकरिता आमचे पक्षकार मे. कोर्टात योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत.

सबब उपरोक्त नमूद केलेल्या व्यक्तींना तसेच तमाम लोकांस सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार हे मिळकतीचे कायदेशिर मालक व वारसदार असून त्यांचे संमतीशिवाय मिळकतीबाबत कुणीही कुठल्याही प्रकारचा व्यवहार करू नये अथवा तत्सम दस्तऐवज करू नये तसे झाल्यास झालेला व्यवहार अथवा दस्तऐवज मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. सदरची जाहीर इशारा नोटीस ही आमचे पक्षकार श्री. राजेंद्र मुरलीधर शिंदे व इतर यांचे सांगणेनुसार व त्यांनी दाखविलेल्या कागदपत्रांनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे. कळावे, ही जाहीर इशारा नोटीस. तारीख - १५/०५/२०१८.

आमचे मार्फत प्रसिद्ध. सही/-

**आनंद वसंतराव खैरनार,**

---

**एचसीसीके व्हेंचर्स लिमिटेड**
(पूर्वी श्रीनाथ इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट कंपनी लिमिटेड या नावाने ओळखली जात होती.)
CIN: L45100MH1983PLC263361
नोंदणी कार्यालय : ३ ऑर्किड, सावरकर नगर, गंगापूर रोड पोलिस स्टेशन समोर, नाशिक ४२२०१३, महाराष्ट्र. दूरध्वनी: +९१ २५३ २३४२६४६
ईमेल: info@hckkventures.com;
वेबसाईट: www.hckkventures.com

**सूचना**

नियमावली ४७ (१) (अ) सहवाचिता नियमावली २९ (१) (अ) सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ला अनुसरून सूचना देण्यात येते की, ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षित वित्तिय निकाल इतर बाबींसमवेत विचारात घेण्यासाठी व त्यास मान्यता देण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा मंगळवार, दिनांक २२ मे, २०१८ रोजी बोलविण्यात आली आहे.

पुढील माहितीकरिता ही सूचना कंपनीच्या www.hckkventures.com या संकेतस्थळावर आणि स्टॉक एक्सचेंज, बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

एचसीसीके व्हेंचर्स लिमिटेड करिता
सही/-
हरिष कांचन
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
दिनांक- १५.०५.२०१८
ठिकाण- नाशिक

---

**TAPARIA TOOLS LTD.**
(Regd. Office: 52 & 52B, MIDC Area, Satpur, Nashik - 422007)
Tele. :(0253) 2350317/318/418, Fax: (0253) 2350740
E-Mail: nashik@tapariatools.com CIN: L99999MH1965PLC013392

## NOTICE

Pursuant to Regulations 29 and 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015, Notice is hereby given that a Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Saturday, the 26th May, 2018 at 1.30 p.m. at its Corporate Office at A-2, 423/424, Shah & Nahar Lower Parel (West), Mumbai 400013 for considering and approving "The Statement of Standalone Audited Financial Results for the quarter / year ended 31st March 2018", "The Financial Statements of the Company for the Financial Year – 1st April 2017 to 31st March, 2018" and other matters.

The details are also available on the company website at www.tapariatools.com and Stock Exchange website www.bseindia.com.

For Taparia Tools Ltd.
Sd/-
V. S. Datey
Company Secretary

Nashik,
15th May 2018

---

## प्रपत्र अ
## जाहीर घोषणा

भारतीय नादारी व कर्जबाजारीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी नादारी ठराव प्रक्रिया) नियम, २०१६ च्या नियम ६ अंतर्गत

**रामानंद स्टील लिमिटेड च्या ऋणदात्यांसाठी**

| अ.क्र. | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | रामानंद स्टील लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराचे स्थापना वर्ष | २० एप्रिल, १९९९ |
| ३ | ज्या प्राधिकरणांतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापनाकरण्यात आली/ ते नोंदणीकृत आले त्याचे नाव | कंपनी अधिनियम, १९५६ |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U27106MH1999PLC119531 |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालयाचा पत्ता (असल्यास) | ४०१, व्यापार भवन, पी. डीमेलो रोड, कॅर्नाक बंदर, मस्जिद (पूर्व), मुंबई, मुंबई शहर, महा-४००००९ |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात नादारीस सुरुवात होण्याचा दिनांक आदेश दिनांक | २० मार्च, २०१८<br>आयआरपी ला कळविण्याचा दिनांक : १४ मे, २०१८ |
| ७ | नादारी ठराव प्रक्रिया पूर्ण होण्याचा अंदाजे दिनांक ठराव प्रक्रिया सुरु होण्याच्या दिनांकापासून | १८० दिवस म्हणजेच १६ सप्टेंबर, २०१८ |
| ८ | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव व नोंदणी क्रमांक | नाव: श्री दुष्यंत सी दवे<br>नोंदणी क्रमांक: IBBI/IP--003/IP-N00061/2017-18/10502 |
| ९ | अंतरिम ठराव व्यावसायिकाचा बोर्डाकडे नोंदविलेला पत्ता व ई-मेल पत्ता | ११०१, दलामल टॉवर, नरीमन पॉईन्ट, मुंबई-४०००२१. आयआरपीचा इमेल: dushyant.dave@dcdave.in |
| १० | अंतरिम ठराव व्यावसायिकाशी संपर्क साधण्यासाठी वापरावयाचा पत्ता व ई-मेल, अ.क्र.९ मध्ये दिलेल्या पत्त्यापेक्षा वेगळा असल्यास | ई-मेल: irp@dcdave.in |
| ११ | दावे सादर करण्याचा शेवटचा दिनांक | आयआरपी च्या सूचना आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांनी म्हणजे २८ मे, २०१८ |

याद्वारे सूचित करण्यात येते की राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने दि. २० मार्च, २०१८ रोजी रामानंद स्टील लिमिटेड यांचेविरुद्ध कॉर्पोरेट नादारी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचा आदेश दिलेला आहे.

याद्वारे रामानंद स्टील लिमिटेडच्या घेणेकऱ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या दाव्यांचा पुरावा दि. २८ मे, २०१८ पर्यंत अ.क्र. ८ वर नमूद अंतरिम ठराव व्यावसायिकाच्या पत्त्यावर सादर करावा.

भारतीय नादारी व कर्जबाजारीपणा मंडळ(कॉर्पोरेट व्यक्तिंसाठी नादारी ठराव प्रक्रिया) नियम, २०१६ च्या नियम ७, ८, ९ व ९अ च्या अनुषंगाने दावे त्यांच्या विनिर्दिष्ट प्रपत्रांत सादर करावेत. कर्मचारी व कामगार वगळता कार्यरत घेणेकऱ्यांनी प्रपत्र बी; वित्तीय ऋणदात्यांनी प्रपत्र सी; कामगार व कर्मचाऱ्यांनी प्रपत्र डी; कामगार व कर्मचाऱ्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने प्रपत्र ई; इतर घेणेकऱ्यांच्या दाव्यांसाठी प्रपत्र एफ.

वित्तीय ऋणदात्यांनी आपल्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच सादर करावेत. इतर सर्व घेणेकऱ्यांना आपापल्या दाव्यांचे पुरावे स्वतः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करता येतील.

ही प्रपत्रे या वेबसाईटवरून डाऊनलोड करता येतील: http://www.ibbi.gov.in/downloadform.html

दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास ते दंड होऊ शकतो.